


# जय हिंद एज्युकेशन कॅम्पसच्या शालेय क्रीडा महोत्सवाचे बीड न.प.चे मुख्याधिकारी शैलेश फडसे यांच्या शुभ हस्ते उद्घाटन

बीड । दिव्य वार्ता ।

बीड शहरातील नामांकित जय हिंद एज्युकेशन कॅम्पस बीड च्या माध्यमातून शालेय क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते सदरील क्रीडा महोत्सवामध्ये जय हिंद कॅम्पस मध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची वेगवेगळी क्रीडा स्पर्धा आयोजित करण्यात आलेली आहे या क्रीडा स्पर्धेचे ५ जानेवारी २०२६ रोजी बीड नगर परिषदेचे कर्तव्यदक्ष मुख्याधिकारी श्री शैलेश जी फडसे साहेब यांच्या शुभहस्ते अत्यंत जल्लोषपूर्ण वातावरणामध्ये उद्घाटन करण्यात आले. सदरील शालेय क्रीडा महोत्सवाच्या उद्घाटन कार्यक्रमास दैनिक सिटीजन बीडचे संपादक तथा बीड नगर परिषदेच्या नगराध्यक्ष प्रतिनिधी शेख मुजीब, बीड नगर परिषदेचे नवनिर्वाचित नगरसेवक खय्युम भाई इनामदार, वाजेत कुरेशी, मा. शेख इकबाल अहमद, खाजा बॉस, मोमीन जुबेर मुन्नाभाई सिटीझन, हाजी आयुब बागवान, मोमीन सेट, स्वच्छता निरीक्षक श्री चांदणे साहेब, मोमीन खुर्शीद भाई, अन्सार भाई, सय्यद फहीम,इफ्तेकार भाई आदी मान्यवरांचे प्रमुख उपस्थिती होती.




यावेळी आलेल्या सर्व मान्यवरांचे स्वागत जय हिंद कॅम्पस चे सचिव तथा नगरसेवक शेख निजाम यांनी केले यावेळी प्रस्तावित पर भाषणामध्ये शेख निजाम यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरच खेळाचे हे महत्त्व समजावून सांगितले व शारीरिक व मानसिक आरोग्य यांच्याकडे विशेष लक्ष देण्याची सूचना केली व बीड शहरातील इस्लामपुरा मोमीनपुरा गांधीनगर अख्तर नगर मोहम्मदया कॉलनी मिलत नगर आदी भागामध्ये रस्ते नाल्या पथदिवे व स्वच्छता इत्यादी पायाभूत सुविधा पुरवण्यासाठी माननीय मुख्याधिकारी साहेबांनी विशेष लक्ष द्यावे अशी आग्रही विनंती केली यावेळी शालेय क्रीडा स्पर्धेचे उद्घाटक तथा मुख्याधिकारी नगरपरिषद बीड श्री शैलेश फडसे साहेब यांनी आपल्या मनोगत व्यक्त करताना म्हटले की, मी स्वतः प्राथमिक शिक्षक म्हणून काम केले असल्याने शाळेचे वातावरण व विद्यार्थ्यांच्या या स्पर्धेविषयीची उत्सुकता मला अत्यंत जवळून माहित आहे विद्यार्थ्यांनी शारीरिक खेळ खेळलेच पाहिजे व स्वच्छतेचे ही भान विद्यार्थ्यांनी ठेवले पाहिजे व बीड शहरातील प्रभागांमध्ये अत्यंत चांगल्या पायाभूत सुविधा पुरवण्याचा नवनिर्वाचित नगराध्यक्ष तथा नगरसेवकांच्या मदतीने पुरवण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला जाईल याची ग्वाही दिली यावेळी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते यावेळी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सदरील कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले

# सावित्रीबाई फुले लोकरत्न पुरस्काराने ऐहतेशाम बागवान सन्मानित

बीड । दिव्य वार्ता ।


**ज्येष्ठ समाजसेवक अब्दुल गणीभाई बागवान यांचे चिरंजीव ऐहतेशाम बागवान यांना काही दिवसांपूर्वी सावित्रीबाई फुले लोकरत्न पुरस्कार जाहीर झाला होता. शनिवारी सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी झाली त्यानिमित्ताने दि.४ जानेवारी रविवारी रोजी या पुरस्कार वितरणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात ऐहतेशाम बागवान यांना सावत्रीबाई फुले लोकरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सदरील कार्यक्रम डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन येथील सभागृहात मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला. ऐहतेशाम बागवान यांना पुरस्काराने सन्मानित केल्यानंतर अब्दुल गणीभाई बागवान यांच्या मित्रमंडळाने ऐहतेशामवर शुभेच्छांचा वर्षाव केला. तसेच योगायोगच म्हणावे लागेल की, गणीभाई यांचे चिरंजीव ऐहतेशाम बागवान यांना रविवारी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले तर त्यांचे वडील गणीभाई यांचा दर्पणदिनी लोकरत्न पुरस्काराने सन्मान होणार.**




कोरोना काळात रुग्णसेवेत स्वत:ला झोकून देत स्वत:च्या जीवाची पर्वा न करता रुग्णसेवेतून आपली ओळख निर्माण करणारे अब्दुल गणीभाई बागवान यांना जिल्हा व राज्यस्तरीय विविध पुरस्कार प्राप्त झालेले आहेत. आपल्या वडिलांच्या पाऊलावर पाऊल ठेवून ऐहतेशाम बागवान यांनी समाजसेवेतून आपली ओळख निर्माण केली आहे. कोरोना काळात एकीकडे वडील गणीभाई हे रुग्णसेवा करत होते तर त्यांचे चिरंजीव ऐहतेशाम हे भाजीपाला व्यवसायातून मिळालेल्या नफ्यातून गोरगरीब गरजूंना भाजीपाला वाटप करून कोरोना काळात दिलासा देत होते. त्यानंतर दरवर्षी रमजान सणानिमित्त रोजेदारांना शरबतचे वाटप करणे असे अनेक उल्लेखनीय कार्य ऐहतेशाम बागवान यांनी केलेले आहेत.

त्यांच्या या उत्कृष्ट कामगिरीची दखल घेत त्यांना सावित्रीबाई फुले लोकरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले असून त्यांच्या या सन्मानाने वडील अब्दुल गणीभाई बागवान भारावून गेले होते. रविवारी हा कार्यक्रम मान्यवरांच्या उपस्थितीत थाटात संपन्न झाला. या छोटेखानी कार्यक्रमात ऐहतेशाम बागवान यांना पुरस्कार देवून सन्मानित करण्यात आले.





६ जानेवारी

# दर्पण दिन निर्भीड लेखणीचा सन्मान

**६ जानेवारी हा दिवस महाराष्ट्राच्या सामाजिक, शैक्षणिक आणि पत्रकारिता क्षेत्रासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. या दिवशी आपण 'दर्पण दिन' साजरा करतो. आधुनिक मराठी पत्रकारितेचे जनक, थोर समाजसुधारक महर्षी बाळशास्त्री जांभेकर यांनी ६ जानेवारी १८३२ रोजी मराठीतील पहिले वृत्तपत्र दर्पण सुरू केले. त्या दिवसापासून मराठी पत्रकारितेची पायाभरणी झाली आणि समाज प्रबोधनाचा एक नवा अध्याय सुरू झाला.**

**दर्पण : समाजाचा आरसा**

दर्पण हे केवळ एक वृत्तपत्र नव्हते, तर ते समाजाचा आरसा होते. समाजातील अन्याय, अंधश्रद्धा, अज्ञान, शोषण यावर प्रहार करत लोकांना जागृत करण्याचे महान कार्य या पत्रातून झाले. म्हणूनच आजही दर्पण हे नाव सत्य, पारदर्शकता आणि निर्भीड पत्रकारितेचे प्रतीक मानले जाते.

**पत्रकारिता : जबाबदारीची लेखणी**

आजचा पत्रकार केवळ बातमी देणारा नसून तो समाजाचा प्रहरी आहे. निर्भीड, निष्पक्ष आणि लोकहितासाठी लेखन करणे हीच खरी पत्रकारिता आहे. सामान्य माणसाच्या समस्या प्रशासन व शासनाच्या दारी मांडणे, त्यांचा आवाज बुलंद करणे हेच पत्रकाराचे खरे कर्तव्य आहे. पत्रकाराची लेखणी ही तलवारीपेक्षाही अधिक प्रभावी असते. ही लेखणी अन्यायाविरुद्ध उचलली गेली, तर क्रांती घडवू शकते; आणि जर ती स्वार्थ, चाटुगिरी किंवा दबावाखाली वापरली गेली, तर समाजाची दिशाच भरकटवू शकते.

आजच्या स्पर्धात्मक युगात काही ठिकाणी पत्रकारिता व्यवसायिक होत चालली आहे. पण पत्रिका रिक्त करून चाटुगिरी करणे नव्हे, तर लोकहितासाठी निर्भीडपणे सत्य मांडणे हाच खरा पत्रकाराचा धर्म आहे. शासन असो प्रशासन चूक जिथे असेल, तिथे प्रश्न विचारण्याची हिंमत ठेवणारी लेखणीच समाजाला योग्य दिशा देऊ शकते. दर्पण दिन आपल्याला हेच शिकवतो की सत्य बोला, निर्भीड रहा, लोकांसाठी उभे रहा आणि आपली लेखणी समाजाच्या कल्याणासाठी वापरा. आजच्या दिवशी सर्व पत्रकार बंधू-भगिनींनी आपल्या लेखणीचा योग्य वापर करण्याची, सत्याच्या बाजूने उभे राहण्याची आणि लोकशाहीचा चौथा स्तंभ अधिक मजबूत करण्याची प्रतिज्ञा करण्याची गरज आहे.

दर्पण दिनाच्या सर्व पत्रकार बांधवांना हार्दिक शुभेच्छा!

आपली लेखणी सदैव सत्याच्या बाजूने आणि जनतेच्या हितासाठी चालत राहो, हीच अपेक्षा.

**शेख मुदस्सिर,** परळी

# आजीवन शिक्षण आणि विस्तार विभाग यांच्या विद्यमाने स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन प्रमाणपत्र वितरण सोहळा संपन्न

अंबाजोगाई, (दिव्य न्युज) : मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबाजोगाई येथे आजीवन शिक्षण आणि विस्तार विभाग वतीने स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन आणि प्रमाणपत्र वितरण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवदास शिरसाठ हे होते, तर प्रमुख अतिथी म्हणून डॉ. गीतांजली मोटे प्रोफेसर समाजशास्त्र विभाग जनविकास महाविद्यालय बनसारोळा यांनी मार्गदर्शन केले. डॉ. मोटे यांनी स्पर्धा परीक्षेची तयारी करत असताना जिद्द चिकाटी सातत्यपूर्ण अभ्यास आणि आत्मविश्वासाने स्पर्धा परीक्षांना सामोरे गेले पाहिजे असे प्रतिपादन केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक आजीवन शिक्षण आणि विस्तार विभागाच्या समन्वयक डॉ. अहिल्या बरुरे यांनी केले. आजच्या स्पर्धात्मक युगात स्पर्धा परीक्षा म्हणजे केवळ नोकरी मिळवण्याचे साधन नसून विद्यार्थ्यांच्या जिद्द, सातत्य, अभ्यासवृत्ती आणि आत्मविश्वासाची कसोटी आहे. योग्य मार्गदर्शन, नियोजनबद्ध अभ्यास आणि सकारात्मक दृष्टिकोन यांमुळेच यशाचा मार्ग सुकर होतो. या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना योग्य दिशा, प्रेरणा आणि यशस्वी अनुभवांचे मार्गदर्शन मिळणार आहे.



तसेच, या कार्यक्रमात विविध अभ्यासक्रम, कार्यशाळा व उपक्रम यशस्वीरित्या पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र वितरण करून त्यांच्या कष्टांना व यशाला गौरवण्यात येणार आहे, असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. शिवदास शिरसाठ यांनी आजच्या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांचे महत्त्व, योग्य नियोजन आणि सातत्यपूर्ण अभ्यासाची दिशा मिळाली आहे. यशासाठी केवळ बुद्धिमत्ता नव्हे तर परिश्रम, संयम आणि आत्मविश्वास आवश्यक असतो, हे पुन्हा अधोरेखित झाले. आज प्रदान करण्यात आलेली प्रमाणपत्रे ही विद्यार्थ्यांच्या मेहनतीची पावती असून त्यांच्या उज्वल भविष्यासाठी प्रेरणादायी ठरतील. मार्गदर्शकांचे अनुभव आणि सूचनांनी विद्यार्थ्यांना निश्चितच नवी ऊर्जा दिली आहे. या मार्गदर्शनाचा योग्य उपयोग करून प्रत्येकाने आपले ध्येय निश्चित करावे. आयोजक, मार्गदर्शक आणि सहभागी विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील बहुसंख्या विद्यार्थी प्राध्यापक उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. मनोरमा पवार यांनी केले तर आभार डॉ. रोहिणी खंदारे यांनी मानले.

# जिंतूर येथे मराठी पत्रकार संघाच्या वतीने बाळशास्त्री जांभेकर यांची जयंती साजरी




जिंतूर / दिव्य न्युज प्रतिनिधी

जिंतूर येथे पत्रकार भवन मध्ये ०६ जानेवारी २०२६ रोजी दर्पण दिनानिमित्त बाळशास्त्री जांभेकर यांची जयंती साजरी करण्यात आली. हा कार्यक्रम सकाळी ११ वाजता करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाच्या झुंजार नेत्या सौ अमृता सुरेश नागरे ह्या होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणून जिंतूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्री गजेंद्र सरोदे , डॉ निषात मुढे, एल बी बुधवंत, इत्यादी होते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शेख शकील अहमद उर्फ बबलू यांनी केले व कार्यक्रमाच्या सुरुवातीला ज्येष्ठ पत्रकार यांचा सत्कार करण्यात आला यामध्ये निहाल अहमद, शेख अहेमद अफरमियाँ, बोरी चे जेष्ठ पत्रकार चौधरी, माघाडे यांचे शाल, हार व स्मृतीचिन्ह देऊन गौरविण्यात आले.यावेळी अमृता सुरेश नागरे यांनी पत्रकार यांना कोणत्याही प्रकारचा पगार नसतो व ते रात्रंदिवस अन्याय अत्याचाराच्या विरुद्ध आपल्या लेखणीतून प्रकाश टाकतात त्यामुळे त्यांचा सत्कार हा जिंतूर शहरातील सर्व नागरिकांच्या व नेत्यांच्या वतीने पुढच्या वर्षी मी स्वतः करेल असे यावेळी सांगितले पत्रकार दिनानिमित्त मराठी पत्रकार संघाचे सर्व पत्रकार यावेळी आवर्जून उपस्थित होते.



# अजितदादा पवार, ७० हजार कोटींच्या सुनावणीचा निकाल अजून लागलेला नाही

## महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळेंचा कडक शब्दात इशारा

पुणे । दिव्य वार्ता ।

**राज्यातील महानगरपालिका निवडणुकीच्या अनुषंगाने राजकीय वर्तुळात घडामोडींना वेग आला आहे, अशातच राज्यात सत्तेत सोबत असलेल्या भाजप आणि राष्ट्रवादीमध्ये सध्या काहीशी तू तू मैं मैं सुरू असल्याचं दिसून येत आहे. अशातच पिंपरी चिंचवडमध्ये घेतलेल्या एका पत्रकार परिषदेमध्ये बोलताना उपमुख्यमंत्री, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष अजित पवार यांनी भाजपवर हल्लाबोल केला. त्यावेळी त्यांनी माझ्यावर ७० हजार कोटी रुपयांच्या भ्रष्टाचाराचे आरोप झाले, हे तुम्हाला माहिती असेल. पण ज्यांनी माझ्यावर भ्रष्टाचाराचे आरोप केले त्या सगळ्यांसोबत मी आज सरकारमध्ये बसलो आहे ना, असा युक्तिवाद करत अजित पवार यांनी त्यांच्यावर टीका करणाऱ्या भाजपच्या नेत्यांना कोंडीत पकडले आहे. त्यावर त्यांना भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी देखील प्रत्युत्तर दिलं त्यानंतर आता याप्रकरणी भाजपचे नेते आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मोजक्या शब्दातच अजित पवारांना डिवचलं आहे.**





आम्ही मागची पानं चाळली तर अजित दादांना बोलता येणार नाही, असा थेट इशारा बावनकुळेंनी अजित पवारांना दिला आहे. तर ७० हजार कोटींच्या सुनावणीचा निकाल अजून लागलेला नाही, असंही ते म्हणालेत. अजित पवारांच्या वक्तव्यावर बावनकुळे म्हणाले, ठीक आहे, हे काही अभिमानास्पद नाही. न्यायालयात सुनावणी सुरु आहे, त्याचा काय निकाल येईल, त्यावर आपण पुढं जाऊ. शेवटी केस विचाराधीन आहे, अजून निकाल लागलेला नाही. अजित दादा प्रगल्भ नेते आहेत. एवढ्या छोट्या निवडणुकीसाठी या बाबी बाहेर काढणे आणि एका महापालिकेसाठी महायुतीत मनभेद निर्माण करु नयेत. हे योग्य नाही. अजित दादा याचा विचार करतील. बोलता खूप येईल, मात्र ही ती वेळ नाही, असंही चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटलं आहे.

### आम्ही मागची पानं पलटली तर....

**पुढे चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, अजित दादांना सल्ला देण्याइतका मी मोठा नाही. महायुतीत मनभेद आणि मतभेद निर्माण होईल असं बोलायचं नाही. असं महायुती समन्वय बैठकीत ठरलं होतं. तरी ते असं का वागले, असं का बोलले, याची मला कल्पना नाही. पण त्यांनी असं बोलायला नको होतं. ते राज्यातील महत्वाचे नेते आहेत, मी त्यांना फार सल्ला देणार नाही. पण पिंपरी चिंचवडमध्ये ते बरेच वर्षे सत्तेत होते. आता आम्ही मागची पानं पलटली, चाळली तर त्यांना ही काही बोलता येणार नाही. मात्र मागची पानं उलटायची आमची ही इच्छा नाही. त्यामुळं अजित दादांनी समन्वय समितीत ठरल्याप्रमाणे वागावे, असा थेट इशारा त्यांनी अजित पवारांना दिला आहे.**

## नाळवंडी रोड ते उड्डाणपुलापर्यंत रस्ता कामाचेही उद्घाटन





**आ.विजयसिंह पंडित यांनी केली डंपिंग ग्राउंडची पाहणी**

बीड, (दिव्य न्युज):- नगर पालिका निवडणूकीत दिलेला विकासाचा शब्द पुर्ण करण्यासाठी आ.विजयसिंह पंडित ताकदीने कामाला लागले आहेत. नाळवंडी रोड ते पान २ वर



**सिल्लोड शहरातील सेना भवन येथे माजी मंत्री आ.अब्दुल सत्तार यांच्या मार्गदर्शनाखाली मंगळवारी पत्रकार बंधूचा सत्कारचा कार्यक्रम संपन्न झाला. पत्रकार दिनानिमित्त शेख अफसर यांच्या गळ्यात शाल हार टाकून व ट्रॉफी देऊन सत्कार करताना माजी मंत्री तथा सिल्लोड – सोयगावचे आमदार अब्दुल सत्तार साहेब तसेच मन्सूर कादरी सर, रविंद्र सोनवणे,गुलाम हूसैन देशमुख चाँद सर ,सोहेल कादरी सर, गजानन दादा काकडे, शब्बीर पटेल, सचिन चौबे, श्याम कुमार पूरे,आजम पठाण,जावेद सौदागर,संजय कुलकर्णी, सैय्यद हारून, रवि देसाई, दर्शन देसाई,पांडव मामा अंधारीककर सत्कारच्या कार्यक्रम उपस्थित होते.**
**(छायाचित्र. शेख अफसर सिल्लोड)**

### जिंतूर येथे याद्या शुद्धीकरण पुनरिक्षण आढावा बैठकीस गैरहजर राहणाऱ्या

## ०९ कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीसा बजावल्या



जिंतूर । दिव्य वार्ता ।

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार ९५ जिंतूर विधानसभा मतदारसंघात मतदार यादी शुद्धीकरणासाठी राबविण्यात येत असलेल्या विशेष सखोल पुनरिक्षण एस आय आर (SIR) दिनांक ०१ जानेवारी २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेल्या अत्यंत महत्त्वाच्या आढावा बैठक व प्रशिक्षणास विनापरवानगी गैरहजर राहिल्याप्रकरणी ०९ पर्यवेक्षकांवर सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी तथा तहसीलदार जिंतूर यांनी कारणे दाखवा नोटीस बजावली आहे.

सदर बैठक मा. उपजिल्हा निवडणूक अधिकारी, परभणी यांच्या अध्यक्षतेखाली श्रीमती शंकुतलाबाई बोर्डीकर महाविद्यालय, जिंतूर येथे पार पडली. या बैठकीत मतदार यादीतील पान २ वर



## शिवसेना शाखा व शिवसेना जनसंपर्क कार्यालयाचे थाटात उद्घाट



पाडळशिंगी । दिव्य वार्ता ।

शिवसेनेचे प्रेरणास्थान आदरणीय बाळासाहेब ठाकरे साहेब व धर्मवीर आनंद दिघे साहेब यांच्या आशीर्वादाने, शिवसेना मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री मा. ना. एकनाथ शिंदे साहेब, संसदरत्न मा. खा. डॉ. श्रीकांतजी शिंदे साहेब यांच्या प्रेरणेतून शिवसेना सचिव संजयजी मोरे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच शिवसेना बीड जिल्हाप्रमुख अँड. चंद्रकांत नवले साहेब यांच्या सक्षम नेतृत्वाखाली आणि त्यांचे शुभहस्ते गेवराई तालुक्यातील पाडळशिंगी येथे शिवसेनेच्या शाखांचे भव्य व उत्साहपूर्ण वातावरणात उद्घाटन संपन्न झाले.शाखाप्रमुख अभय भांडवलकर उपशाखा प्रमुख शुभम नरवडे सचिव प्रतीक मेंडके यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यावेळी पान २ वर

## वडवणीत दर्पण दिन विविध कार्यक्रमाने साजरा

वडवणी । दिव्य वार्ता ।



महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई संस्थापक अध्यक्ष संजय जी भोकरे साहेब, प्रदेशाध्यक्ष गोविंदजी वाकडे सर, सरचिटणीस डॉक्टर विश्वासराव आरोटे, प्रदेश संपर्कप्रमुख वैभवजी स्वामी सर, मराठवाडा अध्यक्ष अनिल राव सावंत साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली शाखा बीड जिल्हा,वडवणी तालुका, डिजिटल मीडिया,पत्रकार हल्ला विरोधी कृती समिती यांच्यावतीने वडवणी येथील ज्ञानगंगा व शिवालय गुरुकुल येथे आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांनी सुरू केलेल्या दर्पण वर्तमानपत्र दिनानिमित्त दर्पण दिन साजरा करण्यात आला यावेळी प्रथम बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले तसेच यावेळी जेष्ठ पत्रकार बुवासाहेब शिंदे पाटील,शासकीय आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त मुंडे सर,धायतिडक सर, राठोड सर पान २ वर





**माजलगाव : येथील नवर्निवाचीत नगरसेवक सय्यद लतीफ यांच्या निवास्थानी भेट देऊन त्यांना शुभेच्छा देण्यात आली. यावेळी माजलगाव न.प.चे नगरसेवक सय्यद लतीफ व खैसर भाई यांच्याकडून बीड न.प.च्या निवडणूीकत विजय प्राप्त करणारे नगरसेवक खुर्शीद आलम, नगरसेवक जैतुल्ला खान आणि शासकीय गुत्तेदार शेख अब्दुल मजीद ऊर्फ मज्जु शेख व संपादक मोहंमद अबुबक यांचा पुष्प गुच्छ देऊन सत्कार करण्यात आले.**

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहम्मद अबुबकर यांनी माऊली ऑफसेट एमएसईबी ऑफीससमोर माळीवेस बीड येथे छापून सां.दिव्यवार्ता कार्यालय कोहिनूर बेकरीजवळ, इस्लामपुरा रोड, बाबा चौक, भालदारपुरा बीड येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधुन व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.वाद विवाद बीड न्यायालय अंतर्गत मो.९३७१२९१०४२, ९५४५३८१२२०, फोन नंबर : ०२४४२-२३१२२०, फॅक्स नंबर : ०२४४२-२३१२२०